Indian Streams Research Journal
Vol.1,Issue.V/June; 12pp.1-4 डॉ.कल्याण साखरकर ISSN:-2230-7850

**Research Papers**

# भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाचे धोरण व महिलांची सद्यस्थिती

**डॉ.कल्याण साखरकर**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
फुलसिंग नाईक महिला महाविद्यालय,
पुसद जि.यवतमाळ, महाराष्ट्र राज्य,(भारत)

## प्रस्तावना :–

शताकानुशतके पारतंत्र्यात दिवस काढल्यानंतर 1947 मध्ये भारत स्वतंत्र झाला. या स्वतंत्र भारताची पुढील वाटचाल लोकशाही पध्दतीने होणार होती. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्या नेतृत्वात संविधानाची निर्मिती केल्या गेली. पारंतत्र्याअगोदरचा भारतीय समाज व पारतंत्र्यातील भारतीय समाज संरचना ही अनेक रूढी, प्रथा, परंपरांवर आधारलेली होती. ज्यामध्ये मानवालाच मानव म्हणून नाकारल्या गेले होते. ही परिस्थिती आधुनिक भारताच्या जडनघडनीत अतिशय धोकादायक ठरू शकते ही बाब ओळखुन परंपरागत समाजाने मानव म्हणून नाकारलेल्या व समाजात दुही निर्माण करणाऱ्या विशमतेची बिजे, कायमची नष्ट करण्याच्या हेतूने डॉ.बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्ये सामाजिक न्यायाची भुमिका स्पष्ट केली.

समाजात पुरूषांइतकीच स्त्रियांची संख्या होती, असे असतांनाही तिच्या कार्यक्षमतेला कुठेही वाव नव्हता. अतिशय दयनिय अवस्थेत स्त्रिया जीवन जगत होत्या. भारतीय संस्कृतीने स्त्रियांना अर्धांगीनीचा दर्जा दिलेला असला तरी मात्र त्यांना अधिकारापासून पदच्च्युत करण्याची व्यवस्था सुध्दा याच संस्कृतीने निर्माण केलेली होती. स्वातंत्र्याच्या पुढील काळात मात्र ही व्यवस्था बदलून स्त्रियांना समान अधिकार देऊन त्यांच्या कर्तृत्वाला दिशा देता येईल असा आधार घटनाकारांनी संविधानात अधोरेखीत केला. उद्देशिकेमध्ये सामाजिक न्यायाचे धोरण स्पष्ट करतांना सामाजिक न्यायाची व्याप्ती सुध्दा नमुद केली. सामाजिक न्याय म्हणजेच सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय (भारतीय संविधान, 2002) असून याआधारावर स्त्रियांच्या विकासाची दिशा निश्चित केली होती.

प्रस्तूत शोध निबंधातून भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाचे धोरण व त्या आधारावर महिलांची स्थिती स्पष्ट केलेली आहे.

▪ ***उद्देश –***

प्रस्तूत शोधनिबंधसाठी पुढील उद्देशांचा समावेश करण्यात आला आहे.

1) स्वातंत्र्य पुर्व काळातील महिलांच्या स्थितीचा आढावा घेने.
2) भारतीय संविधानात समाविष्ट सामाजिक न्यायाच्या संकल्पनेची बाजु तपासने.
3) भारतीय संविधानाने मान्य केलेल्या सामाजिक न्यायाच्या धोरणातून महिलांच्या स्थितीत झालेला बदल अभ्यासने.

▪ ***अध्ययनपध्दती –***

''भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाचे धोरण व महिलांची सद्यस्थिती''या शोध निबंधाचे संशोधन करण्याकरिता आशय विश्लेषन तंत्राचा अवलंब केला आहे. संशोधनाच्या उद्देशावर आधारीत दुय्यम साधन सामग्री म्हणून शासकीय–अशासकीय अहवाल, ग्रंथ, मासिके, दैनंदिन वर्तमानपत्रे इत्यादिंचा अवलंब केला आहे.

▪ ***स्वातंत्र्य पुर्व काळात महिलांची स्थिती–***

आठ–नऊ शतकांपुर्वी भारतीय समाजात स्त्रियांचा दर्जा नमुद करतांना चक्रधर स्वामी म्हणतात–'बाई, पुरूष होऊनी असावे'. म्हणजेच स्त्रीने स्वतःला पुरूषांपेक्षा वेगळे मानू नये(विटाळ,मंथन 2011:4). त्याचप्रमाणे अनेक पौराणीक कथांमध्ये भारतीय संरचनेत स्त्रियांचा पुरूषांइतकाच नव्हे त्यापेक्षा उच्च दर्जा मान्य केलेला आहे. स्त्रियांना काही ठिकानी अर्धांगीनी संबोधले आहेत तर काही ठिकाणी देवीची उपमा देऊन गौरविण्यात आलेले आहे. असे असतांनाही मात्र हा दर्जा–स्थिती नाममात्रच असल्याचे स्पष्ट होते. प्रत्येक ठिकानी मनुस्मृतीचे दाखले देऊन स्त्रियांच्या अधिकारांना नाकारल्या गेले. स्त्रियांचे शिक्षण, संपत्तीचा अधिकार, विवाहाचा अधिकार, राजनैतीक अधिकार यासंदर्भात मनुस्मृतीत भाष्य करून त्यांना 2(17) बेईमान, व्यभिचारी व दुराचारी ई.विशेषणे जोडलीत. त्यानंतरच्या काळात सुध्दा हीच रिघ ओढली गेल्या(आंबेडकरः186–87). 12 व्या शतकानंतर तिचे जीवन अधिकच निम्न दर्जाचे झाले. सतीप्रथा, बालविवाह, केशवपन, पडदा पध्दती, दासी प्रथा अशा रूढी–प्रथांनी तिला अधिकच बंदिस्त केले. यातूनच स्त्रियांचा संपत्तीचा अधिकार नाकारने, शिक्षणापासून वंचित ठेवने,

**Please cite this Article as :** *डॉ.कल्याण साखरकर*, *भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाचे धोरण व महिलांची सद्यस्थिती*: **Indian Streams Research Journal (JUNE ; 2012)**

राजकारनातील सहभाग नाकारने अशा अनिष्ट बाबींना चालना मिळाली. एकंदर स्वातंत्र्य पुर्व प्रत्येक काळात स्त्रियांना एक उपभोग्य वस्तू मानून सर्वंकष पातळीवरील सहभाग नाकारला होता.

▪ ***स्त्रियांच्या दृष्टीकोणातून भारतीय संविधानाने मान्य केलेली सामाजिक न्यायाची संकल्पना***

शतकानुशके वरचढ राहिलेल्या घटकांनी सत्ता–संपत्ती व प्रतिष्ठा यांचा मोठा वाटा बळकावून बहुसंख्य समाजाला या तिन्ही गोष्टींपासून वंचित ठेवले. लोकशाही मुल्यांची समाजात रूजवात करावयाची असेल तर ही विषमता नष्ट केली पाहिजे या विचारातून 'सामाजिक न्यायाची' स्थापना भारतीय संविधानातील उद्येशिकेमध्येच केली आहे. 'सामाजिक न्याय' या संज्ञेत जरी फक्त सामाजिक एवढाच निर्देश असला तरी त्या संकल्पनेला सामाजिक, राजकीय व आर्थिक असे तिन्ही संदर्भ अभिप्रेत असतात.

पारंपारीक समाजात स्त्रियांचा दर्जाही पुरूषांपेक्षा हीन ठरवला जातो. स्त्री कोणत्याही सामाजिक स्तरातील असली तरी पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा तिला कुठेच मिळत नाही. विकास, संधी व सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टिने पाहिल्यास ती शूद्रच असते. सामाजिक न्यायाची 'सामाजिक' बाजू या अवैध, अनैतिक व अमानुश भेदभावांचा निशेध करते. सामाईक हक्कांच्या लाभांपासून कोणालाही लिंगाच्या आधारे अपात्र ठरवले जाऊ नये अशी मागणी करते. केवळ समान संधी देऊन ही विषमता कमी होण्याऐवजी वाढू शकते, ही बाब ओळखून दुर्बल घटकांना विशेष संधी देऊन ''बचावात्मक भेदभाव' करणे सामाजिक न्यायाशी सुसंगत ठरते. तर सर्वांना राजकीय अधिकार किंवा प्रशासनात सेवाप्रवेश देतांना लिंगाच्या आधारे भेदभाव केला जाणार नाही, ही सामाजिक न्यायाची ''राजकीय''बाजू आहे. तसेच स्त्रियांच्या दृष्टीकोणातून आर्थिक न्याय स्पष्ट करतांना परंपरागत समाजव्यवस्थेने संपत्तीबाबत स्त्रियांचा नाकारलेला हक्क मान्य करून स्त्री–पुरूषांच्या समान कामांना समान वेतन तथा नैसर्गीक जबाबदाऱ्या पार पाडित असतांना नोकरीत संरक्षण देऊन आर्थिक न्याय जोपासण्याचा प्रयत्न सामाजिक न्यायाच्या संकल्पनेतून मांडण्यात आला आहे.

▪ ***सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोणातून स्त्रियांचे घटनात्मक हक्क व कायदेशीर तरतूदी***

संविधानाने केवळ सामाजिक न्यायाचे धोरणच स्वीकारले नाही तर त्यासंदर्भात अंमलबजावनीचे धोरण स्वीकारून स्त्रियांचा घटनात्मक हक्क मान्य केला आहे व त्याला सुरक्षा प्रदान करण्याच्या हेतुने वेळोवेळी कायदयांची निर्मिती करून स्त्रियांचा सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांच्या संदर्भात संविधानात समाविष्ट केलेले हक्क–

कलम 14 नुसार स्त्री अथवा पुरूष या आधारावर कोणताही भेदाभेद केला जाणार नाही अशी हमी देऊन कायदयापुढे सर्व व्यक्ती समान असल्याचे स्पष्ट केले आहे.

कलम 15(1) राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरीकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

कलम 15 (3) नुसार कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरीता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

कलम 16 नुसार राज्याच्या अखत्याराखालील सेवायोजन किंवा कोणत्याही पदावरील नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरीकास समान संधी असेल.

कलम 39 (क) उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री व पुरूष नागरिकांना सारखाच असेल.

कलम 39(घ) पुरूष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबददल समान वेतन मिळावे.

कलम 42 नुसार कमाबाबत न्याय व मानवोचित परिस्थिती उपलब्ध करण्यासाठी व प्रसूतिसाहयासाठी तरतूद करील.

कलम 51 अ नुसार स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देण्यासाठी प्रयत्नशिल असेल (जोशी,2007:5–12).

▪ ***भारतीय संविधानातील तरतूदी –***

संविधानाने मान्य केलेल्या सामाजिक न्यायाचे धोरण प्रत्यक्षात अंमलात यावे यादृष्टीकोणातून संसदेने वेळोवेळी कायदे पारीत करून स्त्रियांचे घटनात्मक अधिकार सुरक्षित ठवेले आहेत. स्त्रीयांसदर्भात केल्या गेलेले कायदे पुढीलप्रमाणे–

1948 कारखाना अधिनियम नुसार स्त्रीचे संरक्षण, 1954 विशेष विवाह कायदा, 1955 हिंदू विवाह कायदा, 1955 घटस्फोटाचा कायदा, 1956 हिंदू उत्तराधिकार अधिनियम, 1956 विधवा विवाह कायदा, 1956 पोटगी कायदा, 1956 मुलींचा अनैतिक व्यापार विरोधी कायदा, 1956 दत्तक घेण्याचा कायदा, 1961 हुंडाबंदीचा कायदा, 1961 मातृत्व लाभाविषयीचा कायदा, 1971 वैद्यकीयदृष्टया गर्भपात कायदा, 1976 समान वेतन कायदा, 1983 हिंदू विधवा पुनर्विवाह (निरसन) अधिनियम, 1983 बलात्कार कायदा, 1984 कुटुंब न्यायलय स्थापना, 1986 स्त्रियांचे अश्लिल (प्रदर्शन) प्रतिबंध कायदा, 1987 सती जाण्याच्या कृत्यास प्रतिबंध अधिनियम, 1988 गर्भजल परीक्षा कायदा, 2005 कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम (जोशी,2007:5–12). अशा प्रकारचे कायदे करून परंपरागत समाज व्यवस्थेने निर्माण केलेले अडथळे दुर करून विकासाची संधी निर्माण केली

▪ ***महिलांची सद्यस्थिती***

भारतीय संविधानाने विवक्षित घटकांना समान पातळीवर आनन्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केल्याचे उपरोक्त विश्लेषनात आढळून येते. परंतू परंपरागत समाजव्यवस्थेने आजही स्त्रियांना त्यांच्या हक्कापासून बाजूला सारून संविधानातील सामाजिक न्यायाच्या धोरणाला तिलांजली दिल्याचे दिसून येते–

▪ ***सामाजिक स्थिती–***

***शिक्षण–***

डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाला 'वाघीणीचे दुध' संबोधायचे. त्याअनुशंगाने स्त्रियांचा विकासात सहभाग घ्यावयाचा असल्यास शिक्षण हीच त्याची पायरी होऊ शकते त्यादृष्टीकोणातून त्यांनी भारतीय समाजव्यवस्था लक्षात घेता संविधानात तर्तुद करून ठेवली होती. परंतू स्वातत्र्यानंतरच्या 60 वर्षात सुध्दा अद्यापही स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण 54 टक्केच राहीले आहे.

सारणी 1
भारतातील संविधानातील साक्षरता

| स्त्री साक्षरतेचे प्रमाण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संविधानपूर्वी साक्षरता प्रमाण | | | | संविधानानंतर साक्षरता प्रमाण | | | |
| वर्ष | स्त्री | पुरूष | एकूण | वर्ष | स्त्री | पुरूष | एकूण |
| 1901 | 0.7 | 9.8 | 5.3 | 1961 | 13.0 | 34.4 | 24.0 |
| 1911 | 1.1 | 10.6 | 5.9 | 1971 | 18.7 | 39.5 | 29.5 |
| 1921 | 1.8 | 12.2 | 7.2 | 1981 | 24.8 | 46.9 | 36.2 |
| 1931 | 2.9 | 15.6 | 9.5 | 1991 | 39.2 | 63.9 | 52.1 |
| 1941 | 7.3 | 24.9 | 16.1 | 2001 | 54.0 | 76.0 | 65.38 |
| 1951 | 7.3 | 24.9 | 16.7 | 2011• | 65.46 | 82.14 | 74.04 |

स्त्रोत : वुमेन्स लिंक जाने–मार्च 2009 :15 जनगनना अहवाल, 2001, • जनगणना अहवाल 2011

उपरोक्त सारणीत स्पष्ट दिसून येते की, प्रत्येक जनगणनेत स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढलेले आहे. असे असले तरी मात्र पुरूषांच्या तुलनेत ते प्रत्येकवेळी कमीच आहे. तसेच मुलींच्या शिक्षणाच्या गळतीचे प्रमाण सुध्दा अधिक असून हे प्रमाण प्राथमिक स्तरावर 41.3 तर उच्च प्राथमिक स्तरावर 58.6 आहे (कराळे, 2006 : 23). 'डेव्हलपमेंट ऑफ फ्रिडम' मध्ये अमर्त्य सेन स्त्रियांच्या शिक्षणातून त्यांचे आयुर्मान तथा राजकीय आवाज उठविण्यात कसा सकारात्माक प्रभाव पडू शकतो हे विषद करतात. यादृष्टीकोणातून विचार करता सामाजिक न्यायाचे धोरणाची प्रभावी अमंलबजावनी करण्यात शासन कमी पडत आहे.

स्त्री अत्याचार

स्त्रीयांना संरक्षण मिळवून देण्यासाठी घटनात्मक दृष्टीकोणातून सर्वोतेपरी प्रयत्न केल्या गेल्याचे दिसून येत असले तरी मात्र स्त्रियांवर होणारे अत्याचार वर्षनिहाय वाढत असल्याचेच दिसून येते. युनोओच्या 2009 च्या अहवालानुसार बिहारमध्ये प्रतिदिवशी 3 दलित महिला बलात्काराला बळी पडतात. तर देशाच्या राजधानीच्या ठिकानी एनसीआरबीच्या अहवालानुसार दर अर्ध्या तासाला एक महिला बलात्काराची शिकार ठरते. पुरोगामी समजल्या जानाऱ्या महाराष्ट्रात सुध्दा स्त्री अत्याचाराचे प्रमाण प्रत्येक वर्षी वाढतच आहे. सन 2008 आणि 2009 मध्ये महिला अत्याचारासंबंधी दाखल सरसकट गुन्हयांमध्ये तुलनात्मकदृष्टया पाच टक्याने घट झाल्याचे दिसत असले तरी महिलांचा जीव घेणाऱ्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सन 2008 च्या तुलनेत महिलांच्या खुनाचे प्रमाण 24 टक्क्याने, खुनाच्या प्रयत्नाचे प्रमाण 11 टक्क्याने तर हुंडाबळीचे प्रमाण 12..56 टक्क्यांनी वाढले आहे. बालीकांवरील बलात्काराच्या प्रमाणात वर्शभरात 11.2 टक्क्यांनी तर एका दशकात तब्बल 65.82 टक्क्यांनी वाढ झाल्याची नोंद आहे (लोकमत 24.11.2010:1–2). किरण बेदी यांच्या मते 96 टक्के गुन्हयांची नोंदच होत नाही. या विधानाला सत्य मानल्यास भारतात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न किती गंभीर आहे हे दिसून येते.

सारणी 2

| सन 2007 मधिल स्त्रियांवरील अत्याचार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अत्याचार | बलात्कार | अपहरण/ पळवून नेणे | हुंडाबळी | पती/ नातेवाईक क्रूरता | उत्पीडन |
| संख्या | 18546 | 18811 | 7824 | 69190 | 35324 |
| अत्याचार | स्त्रियांचा व्यापार | सती प्रथा कायदा | स्त्रियांसंदर्भात असभ्य वर्तन | हुंडाप्रतिबंक कायदा | छेढछाड |
| संख्या | 117 | | 2577 | 4332 | 12549 |

राज्य सभा प्रश्नोत्तरप्रश्न क्र556 दि.05.05.2008 वुमेन्स लिंक 2009:15 पृ.34–35

***आर्थिक स्थिती –***

सामाजिक न्यायाची संकल्पना आर्थिक विकासाला अधोरेखीत करते. त्याअनुशंगाने संविधानाने लींगावर आधारीत भेदभाव निती नाकारली आहे. तसेच समान कामास समान वेतन कायदा लागू करून स्त्रियांना आर्थिक सक्षम करण्याचा मार्ग विकसीत केला आहे. असे असले तरी स्त्रियांना अद्यापही आर्थिक विकासात सुरक्षितता प्रदान केल्या गेलेली नाही. निश्चीतच काही भारतीय स्त्रिया फोर्ब्सच्या यादीत गर्भश्रिमंत म्हनून झळकत असल्या व काही ठिकानी नोकरीमधील सर्वोच्च पदावर विराजमान झाल्याचे दिसून येत असले तरी मात्र स्त्रियांचा सहभाग असंघटीत क्षेत्रातच असल्याचे दिसून येते. सन 2005 च्या आकडेवारीनुसार एकूण 50.16 लाख महिला नोकरीच्या क्षेत्रात होत्या. त्यापैकी 29.21 लाख(58 टक्के) महिला पब्लिक सेक्टर मध्ये नोकरीस होत्या तर 20.95 लाख(42 टक्के) स्त्रिया प्रायव्हेट सेक्टर मध्ये नोकरीस होत्या (गीता/उशा,2009:9).ज्याठिकानी स्त्रिया नोकरीला आहेत त्याठिकानी त्यांच्यावर शारीरीक मानसिक अत्याचार होत असल्याचे दिसून येते. डॉ.रिना चौधरी (वुमेन लिंक्स, 2009:53) आपल्या संशोधनात नोकरी करणाऱ्या 69 टक्के स्त्रियांना त्यांच्या कामाच्या ठिकानी निरनिराळया प्रकारच्या छळवणुकिला सामोरे जावे लागते. हया महिला नोकरी टिकविण्यासाठी अन्यत्र कोठेही तक्रार नोंदवित

नसल्याचे त्या आपल्या संशोधनात

सारणी 3

| संघटीत व असंघटीत क्षेत्रातील महिलांचा समावेश | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षेत्र | महिला | | पुरूष | |
| | मिलीयम | शेकडाप्रमाण | मिलीयम | शेकडाप्रमाण |
| संघटीत | 3.78 | 4.2 | 22.95 | 10.2 |
| असंघटीत | 85.99 | 95.8 | 201.41 | 89.8 |
| एकुण | 89.77 | 100.0 | 224.36 | 100.0 |
| (Source:Social Development Report of India,2006,OXFORD.P -86) | | | | |

***राजकीय स्थिती –***

जोपर्यंत स्त्रियांच्या हाती राजकीय शक्तीस्थाने येनार नाहीत तोपर्यंत स्त्रियांच्या हिताचे धोरण राबविल्या जानार नाही याची जानीव ठेवून घटनेपूढे सर्व व्यक्ती समान व प्रत्येक व्यक्तीच्या मताचे समान मुल्य मानुन संविधानाने लांकसंख्येमध्ये पुरूषांऐवढीच समान संख्या असलेल्या स्त्रियांचा राजकारणातील प्रवेश मान्य केला होता. त्याअंतर्गत स्त्रिया देशातील सर्वोच्च पदावर आरूढ झाल्याचे दिसून येते. तर राजकारणातील अनेक महत्वाच्या पदावर (लोकसभेतील सभापती पद, युपीए चेअरमन, राज्यपालपद) स्त्रिया आरूढ असल्याचे दिसून येते. असे असले तरी मात्र राजकारणातील स्त्रियांचा सहभाग नगन्यच असल्याचे दिसून येते. 73 व्या घटनादुरूस्तीतून स्थानीक प्रशासनात स्त्रियांचे आरक्षण मान्य केलेले असले तरी मात्र अनेक वर्षांपासून लोकसभेतील स्त्रि आरक्षणाच्या बिलाला मान्यता मिळाली नाही. यातून राजकीय उदासीनता दिसून येते.

सारणी 4

| लोकसभेतील महिलांचा सहभाग | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| लोकसभा | महिलांची संख्या | एकुण संख्यशी प्रमाण | लोकसभा | महिलांची संख्या | एकुण संख्यशी प्रमाण |
| पहिली | 22 | 4.3 | नववी | 28 | 5.2 |
| द्वितीय | 27 | 5.4 | छहावी | 39 | 7.2 |
| तृतीय | 34 | 6.7 | अकरावी | 39 | 7.2 |
| चतुर्थ | 31 | 5.9 | बरावी | 39 | 7.2 |
| पाचवी | 22 | 4.3 | तेरावी | 49 | 9.0 |
| सहावी | 18 | 3.4 | चवदावी | 44 | 8.0 |
| सातवी | 28 | 5.1 | पंधरावी | 59 | 10.82 |
| आठवी | 44 | 8.1 | | | |
| (स्त्रोतः नंदिनी तडकलकर,(2006) 'महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी संघटना) | | | | | |

***किडा क्षेत्रातील अत्याचार–***

भारतीय संविधानाने स्त्रीयांसाठी सर्वच क्षेत्र खुले केले असले तरी उपरोक्त क्षेत्रामंध्ये ज्यापध्दतीने स्त्रियांना अटकाव केल्या जात आहे, त्याप्रमानेच किडा क्षेत्रात प्रशिक्षण शिबीरादरम्यान अनेक महिला खेळाडूंचे शारीरिक शोषन केले जाते तसेच त्यांना दुयम दर्जाची वागणूक दिली जाते. तथापी अनेक खेळाडू शिबीराबाहेर काढले जाईल या भितीपोटी आपल्यावरील अत्याचाराची वाच्यता करीत नाहीत असा खळबळजनक आरोप सर्वाधिक वेळा मॅराथॉन जिंकणारी आशियाई मॅराथॉन विजेती सुनिता गोदारा हिने केला आहे (लोकमत 19.1.2011:10). यावरून किडा क्षेत्रात सामाजिक न्यायाचे धोरण कशा पध्दतीने पायमल्ली तुडवल्या जाते हे सिध्द होते.

▪ ***निष्कर्ष***

19 मार्च 2011 ला संपूर्ण जग तदवतच भारत सुध्दा शताब्दी 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' साजरा करेल. जर्मनीच्या क्लारा झेटकिन यांनी कोपेहेगन येथे भरलेल्या परिषदेत वर्षातील एक दिवस 'महिला दिन' म्हणून निर्देषित करण्याची मागणी केली होती. त्यानुसार 19 मार्च 2011 ला पहिला आंतरराष्ट्रीय महिला दिन' साजरा झाला. परंतू असे असतांनाही कोणत्याही राष्ट्राने खऱ्या अर्थाने स्त्रियांचे अस्तित्व मान्यच केले नाही. भारतातील महिलांची दयनिय अवस्था लक्षात घेवूनच भारतीय संविधानात सामाजिक न्यायाच्या धोरणाचा समावेश करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना समान पातळीवर आनून नवभारताच्या उभारणीसाठी त्यांचा सहभाग नोंदविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केल्याचे दिसून येतात. त्याअनुशंगोने कायदेशिर तरतुदी करून संविधानातील तरतुदींना संरक्षण सुध्दा प्राप्त करून दिले. त्यातूनच 'स्त्री–मुक्ती',' स्त्रियांचे

स्वातंत्र्य', 'स्त्रियांचे हक्क', 'महिलांचा विकास', 'महिलांचे सक्षमिकरण' अशा संकल्पना उदयास आल्यात. परंतू अद्यापही स्त्रियांच्या विकासाची गती अतिशय संथ आहे. ज्याक्षेत्रात स्त्रिया पुढे गेलेल्या आहेत तिथेही त्या पुर्णतः सुरक्षित नाहीत. 73 व्या घटना दुरूस्तीने स्त्रियांना स्थानीक प्रशासनात राजकिय व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. मात्र शिक्षणाचा अभाव, परंपरागत पुरूष प्रधान संस्कृती यातून खरी सत्ता मात्र अद्यापही पुरूषांच्या हाती एकवटलेली आहे. एकीकडे देशाचे सर्वोच्च पद ते प्रशासनातील सर्वोच्च पद स्त्रियांकडे असल्याचे चित्र दिसून येते तर दुसरीकडे मात्र स्त्रिया अद्यापही स्वतःवर होत असलेल्या अन्याय अत्याचारपासून न्याय मिळण्यासाठी संघर्षरत आहे. खऱ्या अर्थाने अद्यापही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला 'सामाजिक न्याय' स्त्रियांच्या बाबतीत नाकारल्या गेला आहे.

### *संदर्भ सुची*

आंबेडकर बाबासाहेब(अेडी).,हिंदू धर्मावर घाणाघाती हल्ला, पुणे, रघुवंशी प्रकाशन.
—————भारतीय संविधान, 2002, संचालक,शासन मुद्रण व लेखन सामग्री महाराष्ट्र शासन
गीता / उषा, 2009,'वुमेन्स एम्प्लायमेंट ॲन्ड सोशल सिक्युरिटी,'वुमेन लिंक, जाने—मार्च पृ.9
जोशी विजय, 2007.'कायदे स्त्रिया व मुलांचे''नागपूर, मुकुंद प्रकाशन
कराळे गंगाधर, 2006 ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन, नागपूरः मंगेश प्रकाशन, पृ.23
संबानगी डी. 2009, 'एज्युकेशन फॉर वुमेन्स एम्पॉवरमेंट इन इंडीयाःप्रॉस्पेक्टस एन्ड चालेंजेस', दिल्ली वुमेन्स लिंक, सोशल ॲक्शन ट्रस्ट, व्हीओएल 15.पृ13.
तडकलकर नंदिनी, 2006.'महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी संघटना (पीएचडी शोधप्रबंध नांदेड)
—————लोकमत दि. 24.11.2010 पृ.1—2
————राज्य सभा प्रश्नोत्तर प्रश्न क.556 दि. 05.05.2008 वुमेन्स लिंक, ऐप्रील—जून 2009 :15 पृ.34—35
————वुमेन लिंक्स, 2009, व्हीओएल 15, जुलै—सप्टे. पृ.53
————सोशल डेव्हलमेंट रिपोर्ट ऑफ इंडीया, 2006, ऑक्सफोर्ड, पृ.86
————लोकमत, 19.1.2011पृ.10
————'विटाळ' मंथन, लोकमत, दि. 23.01.11 पृ.4

**Please cite this Article as :** *डॉ.कल्याण साखरकर*, *भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाचे धोरण व महिलांची सद्यस्थिती*: **Indian Streams Research Journal (JUNE ; 2012)**